# युवा शेतकरी पुरस्कार

देण्यात येणारे पुरस्कार संख्या - ०८ (प्रत्येक कृषि विभागातून एक याप्रमाणे)

राज्यातील शेतीविषयक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने महत्वाचे व मोलाचे कार्य करणाऱ्या वय वर्ष १८ ते ४० मधील शेतक-यांना सन २०20 पासून राज्यशासनाव्दारे युवा शेतकरी पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात येत आहे. युवा पुरस्कार विजेत्या शेतक-याला रु.३०,०००/- रकमेचा धनादेश, स्मृतीचिन्ह (ट्रॉफी), प्रशस्तिपत्र व सपत्नीक / पतीसह सत्कार असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कार निवडीसाठी मा. मंत्री (कृषि) यांच्या अध्यक्षतेखाली अस्तित्वात असलेल्या मंत्री समिती मार्फत राज्यातून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येऊन, सदर समितीने निवड केलेल्या शेतक-यास अथवा संस्थेस हा पुरस्कार देण्यात येतो.